सकाळ १५ मे २००६

# 'स्पर्धेत टिकण्यासाठी नावीन्यपूर्ण उत्पादने निर्माण करा'

## पारखे पुरस्कारांचे वितरण

**पुणे, ता. १४ :** "उद्योग क्षेत्रातील सध्याचे वातावरण लघुउद्योगांच्या वाढीसाठी अत्यंत पोषक आहे. मात्र, या क्षेत्रातही आता आंतरराष्ट्रीय कंपन्या व इतर देशांकडून स्पर्धा निर्माण होत आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी लघुउद्योजकांनी ग्राहकांच्या गरजांनुसार नावीन्यपूर्ण उत्पादने निर्माण करावीत. तसेच उच्च दर्जा, वाजवी किंमत आणि उत्तम सेवा ही त्रिसूत्री लक्षात ठेवावी,"" असे फिनोलेक्स केबल्स कंपनीचे अध्यक्ष प्रल्हाद छाब्रिया यांनी आज सांगितले.

नावीन्यपूर्ण उत्पादने व सेवांसाठी "मराठा चेंबर"तर्फे देण्यात येणाऱ्या पारखे पुरस्कारांचे वितरण आज श्री. छाब्रिया यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. मराठा चेंबरचे अध्यक्ष रवी पंडित, महासंचालक एस. रामचंद्रन, पारखे पुरस्कार समितीचे कार्यकारी सचिव व्ही. व्ही. मुजुमदार, म. ग. पाठे, एन. डी. जोशी, पारखे पुरस्कारांचे विश्वस्त अरुण पारखे, तसेच विश्वास देवल या वेळी उपस्थित होते.

श्री. छाब्रिया म्हणाले, की नवा उद्योग सुरू करणे आता सोपे असून पूर्वीप्रमाणे त्यात फार धोके व क्लिष्टता राहिलेली नाही. उदारीकरणाच्या धोरणामुळे सध्या चीनसारख्या इतर देशांमधील उत्पादने भारतीय बाजारपेठेत दाखल होत आहेत. निर्यातीमध्येही अनेक देशांपासून स्पर्धा निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत आपले उत्पादन इतरांपेक्षा अधिक नावीन्यपूर्ण असण्याची गरज आहे.

लघुउद्योजकांना पाठबळ देण्याच्या उद्देशाने मराठा चेंबरतर्फे हे पुरस्कार देण्यात येत आहेत, असे श्री. पंडित यांनी स्पष्ट केले. पारखे पुरस्कारामुळे उत्पादनाला योग्य पावती मिळाली आहे. येत्या चार ते पाच वर्षांत कंपनीची उलाढाल २५ कोटी डॉलरपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे, असे मनोगत महेश देशमुख यांनी व्यक्त केले. श्री. देवल यांनी आभार मानले.

### पुरस्कारांचे मानकरी

- गो. स. पारखे औद्योगिक मान पुरस्कार महेश देशमुख, चेतास कंट्रोल सिस्टिम्स प्रा. लि. शिवदास मेनन, फ्लूइडाईन कंट्रोल सिस्टिम्स प्रा. लि.
- हरिमालिनी जोशी पारितोषिक डॉ. व्ही. एम. नाडकर्णी, रॅंड पॉलिप्रॉडक्ट्स प्रा. लि.
- रमाबाई जोशी पारितोषिक मे. ओयकोस, मानसी करंदीकर व केतकी घाटे
- डॉ. आर. जे. राठी पारितोषिक सह्याद्री स्टार्च अँड इंडस्ट्रीज प्रा. लि.